# सेवाकार्यात सहभाग घ्या : हिरेमठ

पुणे, ता. १९ : बाहेरून पाठिंबा देऊन कोणतेही सरकार चालत नाही, त्याप्रमाणे बाहेरून पाठिंबा देऊन सेवाकार्यही चालत नाही. नागरिकांनी देशातील सेवाकार्यांना भेटी द्याव्यात, त्यात थेट सहभाग घ्यावा. यातून देशातील एकही नागरिक, पीडित उपाशीपोटी राहणार नाही, असे मत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या केंद्रीय कार्यकारिणीचे सदस्य सुहास हिरेमठ यांनी व्यक्त केले.

गणेश कला क्रीडा मंच येथे राष्ट्रीय स्वयंसेवक संघातर्फे आयोजित 'सेवासंगम : दर्शन सेवाकार्याचे' या सेवा प्रकल्पाच्या कार्याच्या प्रदर्शनाचा समारोप रविवारी झाला. या वेळी उद्योजिका, मुकुल माधव फाउंडेशनच्या व्यवस्थापकीय संचालक रितू छाब्रिया, संघाचे प्रांत कार्यवाह डॉ. प्रवीण दबडघाव, पश्चिम महाराष्ट्र सेवाप्रमुख अनिल व्यास, जनकल्याण समितीचे अध्यक्ष डॉ. रवींद्र साताळकर, 'सेवावर्धिनी'चे कार्यवाह सोमदत्त पटवर्धन, मनीषा जोशी, मंगेश घाटपांडे उपस्थित होते.

हिरेमठ म्हणाले, "देशात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे दीड लाख सेवाप्रकल्प सुरू आहेत, पण आपल्याशी संबंधित नसलेले अनेकजण निस्वार्थपणे लोकांची सेवा करत आहेत. देशात भ्रष्टाचार, चोऱ्या करणाऱ्यांपेक्षा सेवाकार्य करणाऱ्यांची संख्या मोठी आहे, पण ते प्रसिद्धीपासून दूर आहेत. देशात पीडित समाज असेल तर राष्ट्रही दुर्बल असते, त्यामुळे देशाला समर्थ करण्यासाठी सेवाकार्य वाढले पाहिजे.




**गणेश कला क्रीडा मंच : राष्ट्रीय स्वयंसेवक संघातर्फे आयोजित 'सेवासंगम : दर्शन सेवाकार्या'चे या प्रदर्शनाच्या समारोपप्रसंगी सुहास हिरेमठ यांचा सत्कार करताना डॉ. रवींद्र साताळकर. शेजारी रितू छाब्रिया.**

## 'आमचे आणि संघाचे काम एकविचाराचे'

संस्कृती संवर्धन, समर्पण, शिस्त अशी संघाची ओळख आहे. 'सीएसआर'चा कायदा येण्यापूर्वीपासून सगळ्यांना एकत्र करून संघ समाजाची सेवा करत आहे. मुकुल माधव फाउंडेशन आणि संघ एकाच विचाराने काम करत आहे याचा आनंद आहे. सामाजिक, आरोग्य, महिला क्षेत्रात स्पर्धात्मक काम न करता समन्वयाने काम केले तर समाजाला अधिक लाभ मिळेल, असे छाब्रिया यांनी सांगितले.

सकाळ पुणे 20 जाने 20

### सर्वोत्कृष्ट स्टॉल

१५० स्टॉलमधून सेवाकार्याच्या निकषांवर जनकल्याण समितीला प्रथम, सेवा सहयोग संस्थेला द्वितीय तर महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेला तृतीय क्रमांक देण्यात आल्याची घोषणा या वेळी करण्यात आली.